**निम्न साखळी बृ. ल. पा. प्रकल्प**
**ता. नांदगाव (खं.), जि. अमरावती**
**या योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.**

**महामंडळाचा निर्णय क्र. २९५ /विपाविम/कातां.४/२४(७)/निम्न साखळी /उवसिंम / प्रथम सु.प्र.मा/ (धा.क्र.२४/१७), दिनांक १६/३/२०१९**

**संदर्भ:** : १. अ. अ., रा. तां. स. स.,नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्र. रा.ता.स.स.(१)/निम्न साखळी बृ.ल.पा. प्रकल्प / (धा.क्र.२८/१८)/९७८/१८ दि.२४.१०.२०१८.
२. महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/ (३५/२०१५) / जसं(आ) मंत्रालय, मुंबई, दि. ०९ सप्टेंबर २०१५.

**प्रस्तावना :**

निम्न साखळी बृ.ल.पा. प्रकल्प हा प्रकल्प या महामंडळांतर्गत अमरावती जिल्ह्यातील नांदगांव (खंडेश्वर) तालुक्यातील हरणी गावाजवळ साखळी नदीवर बांधण्यात येतआहे. सदर प्रकल्पामुळे अमरावती जिल्ह्यातील नांदगाव (खंडेश्वर) तालुक्यातील ९ गावातील १७९० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन पुरस्कृत बळीराजा जलसंजीवनी योजनेत आहे. तसेच हा प्रकल्प सिंचन अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील आहे.

निम्न साखळी बृ.ल.पा. प्रकल्प ता. नांदगांव(खं.) जि. अमरावती या योजनेस शासन निर्णय क्र.२२०५ /(७०/२००५)/लपा-२ दि.०७.०३.२००६ अन्वये रु.३४.९५ (रु. चौतीस कोटी पंच्यान्नव लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची २००८-०९ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाच्या दरम्यान योजनेच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल, इतर कारणे व अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादी कारणामुळे वाढ झाली असुन योजनेची अद्यावत किंमत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

निम्न साखळी लघु पाटबंधारे योजनेचा प्रथम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. २४.१०.२०१८ रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. १ नुसार प्राप्त झालेला आहे.

निम्न साखळी लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.३१.०१.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होऊन प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १२.०२.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७३ व्या बैठकीतील ठराव क्र. ७३/३ नुसार निम्न साखळी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या रू. १८८.२० कोटी अंदाजित किमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली

असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत रू. ३४.९५ कोटीच्या तुलनेत प्रथम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. १५३.२५ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू लक्ष | प्रमा तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे | २३.४१ | ६६.९८ % |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ७४.४२ | २१२.९३ % |
| ३ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | २४.२१ | ६९.२७ % |
| ४ | अपु-या सर्वेक्षणामुळे झालेली वाढ | १४.११ | ४०.३७ % |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | १४.३७ | ४१.१२ % |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | २.७३ | ७.८१ % |
| | एकूण | १५३.२५ | ४३८.४८% |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय** -

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये निम्न साखळी बृ.ल.पा. प्रकल्प ता. नांदगांव(खं.) जि. अमरावती या योजनेच्या एकूण अंदाजित किंमत रु.१८८.२० कोटी (रूपये एकशे अठ्ठ्याऐंशी कोटी वीस लक्ष फक्त) खर्चास प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. यापैकी रु.१८३.१४ कोटी (रु. एकशे त्र्यांएशी कोटी चौदा लक्ष फक्त) कामा प्रित्यर्थ व रु. ५.०६ कोटी ( रूपये पाच कोटी सहा लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरित कामासाठी सन २०१७-१८ (ज.सं.वि./सा.बां.वि.) या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदीचा गोषवारा सोबत परिशिष्ट -१ मध्ये संलग्न आहे.

**ठळक बाबी** :-

| | | |
|---|---|---|
| अ) | योजनेचे सिंचन क्षेत्र (ICA) | १७९० हेक्टर |
| ब) | प्रकल्पाची सिंचन क्षमता | २०९४ हेक्टर |
| क) | योजनेचा एकुण पाणीसाठा | ९.६४ दलघमी |
| ड) | योजनेची प्रति स.घ.मी.पाणीसाठा किंमत | रु. १,९५,२२८/- (मापदंड रु.१,२२,१३२/-) |
| इ) | योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | १.०७ > १.०० (मापदंड १.०० पेक्षा जास्त) |

हा निर्णय संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १.३ नुसार नियामक मंडळाच्या दि. १२.०२.२०१९ रोजी संपन्न ७३ व्या बैठकीतील मान्य झालेल्या विषय क्र. ४ (ठराव क्र. ७३/३) चे अनुषंगाने मा.सचिव उपसमितीने व रा.ता.स.स.च्या छाननी अहवालातील मुद्या क्र. १ ते २७ मधील उपस्थित मुद्यांचे पुर्ततेच्या अटींसह महामंडळास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-०५, "४७०२ लहान पाटबंधारे वरील भांडवली खर्च ८० - सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०१)" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता (०१/१९) या अनुक्रमांकावर नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आली आहे.

सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

१) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

२) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

३) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे. वित्तीय अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

५) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालात नमुद मुद्दा क्र. २६ व २७ चे अनुपालन करण्यात यावे.

६) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

७) प्रकल्पाचे काम नियोजनानुसार पूर्ण करण्यात यावे.

८) सदर निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचे आदेशानुसार.

**कार्यकारी संचालक**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
नागपूर

**सोबत :** परिशिष्ट -१

**प्रतिलिपी :- (सहपत्रासह)**

१. स्वीय सचिव, मंत्री, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
२. प्रधान सचिव (ज.सं.प्र. व वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सचिव (ज.सं.व्य. व ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय - २२) मंत्रालय, मुंबई-३२.

(९३)

७. नियोजन विभाग, ~~(कार्यासन १४३४)~~ मंत्रालय, मुंबई-३२.
८. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय.
११. अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती.
१२. जिल्हाधिकारी, अमरावती.
१३. कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती.
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती.
१५. चिशा कार्यासन -विपाविम संग्रहार्थ.

**निम्न साखळी बृ. ल. पा. प्रकल्प**
**ता. नांदगाव(खं.), जि. अमरावती**
**या योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय**
**मान्यता देण्याबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.**

**महामंडळाचा निर्णय क्र.४९५ महामंडळाचा निर्णय क्र९५/१७/विपाविम/कातां.४/निम्न साखळी /उवसिंम / प्रथम सु.प्र.मा/ (धा.क्र.२४/१७), दिनांक १६/९/२०१९**

| अ.क्र. | उपशिर्ष | रक्कम | | तरतूद एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| | | शिर्ष कामे | मुख्य कालवा | |
| १ | "ऐ" प्राथमिक कामे | ०.५५ | ०.०० | ०.५५ |
| २ | "बी" जमीन | ९६.७० | ०.०० | ९६.७० |
| ३ | "सी" मुख्य कामे | ७१.३८ | ०.०० | ७१.३८ |
| ४ | "डी" विमोचक | १.४४ | ०.०० | १.४४ |
| ५ | ई-प्रपात | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ६ | "एफ"-RHT Works | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | "जी"-पूल | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | "एच"-एस्केप | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ९ | "के" ईमारत | ०.१५ | ०.०० | ०.०० |
| १० | "एल" - मातीकाम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ११ | "एम" वृक्षारोपण | ०.३६ | ०.०० | ०.३६ |
| १२ | "ओ" संकीर्ण | २.८८ | ०.०० | २.८८ |
| १३ | "पी" देखभाल | ०.७२ | ०.०० | ०.७२ |
| १४ | "आर" दळणवळण | ०.४७ | ०.०० | ०.४७ |
| १५ | "एक्स" पर्यावरण | ०.१० | ०.०० | ०.१० |
| १६ | "पि" निगराणी | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १७ | "यु" वितरीका | ०.०० | ८.३९ | ८.३९ |
| | **एकूण कामाप्रित्यर्थ किंमत** | **१७४.७५** | **८.३९** | **१८३.१४** |
| | **अनुषंगिक खर्च** | **५.०६** | **०** | **५.०६** |
| | **योजनेची एकूण किंमत** | **१७९.८१** | **८.३९** | **१८८.२०** |

**कार्यकारी संचालक**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
**नागपूर**